# डोलोरेस हुएर्टा

## शेतमजुरांची नेता



डोलोरेस हुएर्टा (1930 -  )




डोलोरेस हुएर्टाचा जन्म १० एप्रिल १९३० मध्ये डॉवसन, न्यू मेक्सिको येथे झाला. तिचे वडील जुआन फर्नांडीस शेतमजूर होते तर तिची आई एलिसिया फर्नांडीस डोलोरेस घराची आणि आपल्या मुलाबाळांची देखभाल करायची.

डोलोरेसच्या लहानपणीचा तिचे आई-बाबा विभक्त झाले. त्यामुळे तिची आई मुलांना घेऊन स्टॉकटन, कॅलिफोर्निया येथे राहायला गेली. तिथे डोलोरेसचे आजोबा हरकुलानो शावेजही त्यांच्या सोबतीला आले.

एकल पालक म्हणून डोलोरेसची आई मिसेस फर्नांडीसचे आयुष्य फारच कष्टाचे होते. ती प्रचंड मेहनती असली तरी त्यावेळी एकूणच कमी नोकऱ्या उपलब्ध होत्या. खूप प्रयत्न केल्यावर फळांचा रस डब्यात हवाबंद करणाऱ्या कारखान्यामध्ये तिला काम मिळाले. हे काम संपले की वेटरची नोकरी अशा एका वेळी ती दोन नोकऱ्या करायची. डोलोरेसचे आजोबा मुलांकडे लक्ष देत.

डोलोरेसला आजोबा खूप आवडत आणि जवळचे वाटत. त्यांच्याबरोबर गप्पागोष्टी आणि हास्यविनोद करायला तिला खूप मजा यायची. आजोबा तिला लाडाने “बडबडकांदा” म्हणायचे.

एके दिवशी मिसेस फर्नांडीसना चांगली संधी चालून आली. तिच्या काही मित्रांनी तिला हॉटेल चालवशील का असे विचारले. मिसेस फर्नांडीसनी ते काम आनंदाने स्वीकारले आणि ताबडतोब सुरु केले. डोलोरेस आणि तिचे भाऊ हॉटेलची स्वच्छता, चादरी बदलणे, भांडी घासणे, कपडे धुणे ह्या कामांची पूर्ण जबाबदारी घेऊन आईला हातभार लावू लागले. दिवसभराची शाळा झाल्यानंतर न कंटाळता डोलोरेस आईला भरपूर मदत करायची.

डोलोरेसच्या लहानपणी कॅलिफोर्नियामधील बहुतांश मेक्सिकन-अमेरिकन लोकांसाठी तो खूप अवघड काळ होता. बरेचजण दिवसभर कापूस, लेट्युस आणि स्टॉबेरीच्या शेतात मजुरी करायचे. दिवसभर उन्हातान्हामध्ये काबाडकष्ट करूनही खूपच कमी मजुरी मिळत असे. संपूर्ण कुटुंब राबायचे तेव्हा कुठे जेमतेम अन्न आणि निवाऱ्याची सोय होत असे.



कधीकधी मिसेस फर्नांडीस ह्या गरीब मजुरांची आपल्या हॉटेलमध्ये मोफत राहण्याची व्यवस्था करायची. आपल्यापेक्षा गरजू आणि गरीब लोकांशी प्रेमाने आणि सहानुभूतीने वागावे हे डोलोरेस आपल्या आईकडून शिकली.

आपल्या जातीबांधवानी चांगले आयुष्य जगावे ह्यासाठी मिसेस फर्नांडीस धडपड करीत. जे योग्य आहे त्यासाठी निर्भीडपणे आवाज उठवायला डोलोरेसला तिच्या आईने शिकवले.

शेतमजुरांचे खडतर आयुष्य पाहून डोलोरेसला खूप वाईट वाटे. आपल्याला सुरक्षित घर आणि कुटुंब आहे, आपण शाळेत जाऊ शकतो, नाच व संगीत शिकू शकतो ह्याबद्दल डोलोरेस स्वतःला सुदैवी समजे.

डोलोरेसने शाळा आणि कॉलेजमध्ये मन लावून अभ्यास केला आणि शिक्षिका होण्याचे आपले स्वप्न पूर्ण केले. तिचे आपल्या विद्यार्थ्यांवर खूप प्रेम होते. ह्या गरीब विद्यार्थ्यांची परिस्थिती पाहून तिचे मन उद्विग्न होई. उपाशी आणि अनवाणी मुलांना शिकवताना तिला खूप दुःख होई. ह्यासाठी काहीतरी करायलाच हवे असा निश्चय करून तिने शिक्षिकेच्या नोकरीचा राजीनामा दिला.

तिने शेतमजुरांना संघटित केले. डोलोरेसची इच्छा होती की त्यांनी एकत्र येऊन कामाचा योग्य मोबदला तसेच कामाच्या ठिकाणी चांगल्या सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी आग्रह धरावा.

अशी धडपड करणारी ती एकटी नव्हती. १९५५ मध्ये डोलोरेसची ओळख सीजर शावेजशी झाली. त्याचेही स्वप्न तिच्या स्वप्नाशी मिळतेजुळते होते. सीजर आपल्या कुटुंबाच्या मदतीसाठी शेतमजुरी करतच लहानाचा मोठा झाला होता. आता डोलोरेस आणि सीजर दोघे मिळून शेतमजुरांच्या हक्कांसाठी काम करू लागले.



सीजर शावेज

३० सप्टेंबर १९६२ मध्ये डोलोरेस आणि सीजरनी एक विशेष बैठक आयोजित केली. शेतमजुरांनी स्वतःच्या हक्कासाठी संघटना स्थापन करण्याची वेळ आली आहे असे त्यांना वाटत होते. बैठकीत कामाचा योग्य मोबदल्याची मागणी हे संघटनेचे मुख्य उद्दिष्ट ठरवले गेले आणि “नॅशनल फार्म वर्कर्स असोसिएशन” (NFWA) चा जन्म झाला. सीजर शावेज ह्यांची अध्यक्ष आणि डोलोरेसची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली.

१९६५ मध्ये सीजर आणि डोलोरेसनी द्राक्षतोडणी कामगारांच्या संपाचे नेतृत्व केले. जास्त मजुरी मिळत नाही तोपर्यंत कामावर बहिष्कार टाकण्याचे ठरवण्यात आले. कामाच्या ठिकाणी चांगल्या सोयी असाव्यात अशीही मागणी केली. लोकांचा पाठिंबा मिळावा ह्यासाठी सीजरने राज्याची राजधानी सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया येथे ३००० मैलाचा मोर्चा आयोजित केला. डोलोरेस द्राक्षे तोडणी कामगारांना सोबत म्हणून मागे थांबली.

## विषारी द्राक्षांवर बहिष्कार!




वर्तमानपत्रे आणि टीव्हीने ह्या मोर्चाची दखल घेऊन मोठी बातमी दिली. त्यामुळे द्राक्षतोडणी मजुरांचे प्रश्न देशाच्या कानाकोपाऱ्यापर्यंत पोचले. अखेरीस एका कंपनीने द्राक्ष तोडणी मजुरांना अधिक मजुरी आणि कामाच्या ठिकाणी चांगल्या सुविधा देण्याचे मान्य केले. डोलोरेसने आपल्या मित्र आणि हितचिंतकांच्या सोबत हा आनंद साजरा केला. हळूहळू इतर द्राक्षमळ्याच्या मालकांनीही ह्या मागण्या मान्य केल्या.

डोलोरेस आणि सीजरने आपल्या संघटनेचे नाव बदलून “युनायटेड फार्म वर्कर्स ऑफ अमेरिका” असे ठेवले.

शेतमजुरांच्या जीवनात सुधारणा जरूर होत होती पण अजून बरेच काम बाकी होते. डोलोरेसने शेतात विषारी रसायने वापरण्याच्या विरुध्द आवाज उठवला. शेतमजुरांसाठी कल्याणकारी कायदे व्हावे ह्यासाठी डोलोरेस वॉशिंग्टनला गेली. तिने “ला कासा” म्हणजेच शेतकऱ्यांचे हित ह्यासाठी देशभर प्रवास केला. १९७३ मध्ये डोलोरेसने द्राक्षे आणि लेट्युसवरील बहिष्काराच्या संपाचे नेतृत्व केले. जोपर्यंत शेतमजुराला योग्य मजुरी मिळत नाही तोपर्यंत कुणाही अमेरिकन माणसाने द्राक्षे व लेट्युस विकत घेऊ नये अशी तिची धडपड होती. संप यशस्वी ठरला आणि कायद्यामध्ये बदल झाले.

डोलोरेसने शेत्माजुरांबरोबरच स्त्रिया आणि मुलांसाठीही काम केले. तिला वाटे की स्त्रियांना समान हक्क आणि मुलांना चांगल्या शाळा मिळाव्या.

डोलोरेसला तिच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अनेक पुरस्कार मिळाले. १९९३ मध्ये तिची नॅशनल विमेन्स हॉल ऑफ फेम म्हणून निवड झाली.

कुणालाही न घाबरता अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा ही तिच्या आईची शिकवण होती. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत न डगमगता ती निर्भीडपणे न्यायासाठी लढत राहिली. अनेक लोकांचे राहणीमान सुधारल्याबद्दल डोलोरेसचे शतशः आभार!



**समाप्त**